प्रशासकीय मान्यता दिली जाते. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याचे आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे ही पुर्णपणे जिल्हा परिषदांची जबाबदारी आहे. तथापि, ग्रामीण स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे कोणतेही अधिकार जिल्हा परिषदेस नसल्यामुळे जिल्हा परिषदेस जिल्ह्यातील स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे प्रभावी संनियंत्रण करणे शक्य होत नाही.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संदर्भाधिन क्र. १ व २ येथील शासन निर्णय व शुद्धिपत्रक यामधील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या तरतूदी अधिक्रमित करुन रु.५० लक्ष पर्यंतच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार ग्रामसभेस व रु.५० लक्ष ते रु.५ कोटी पर्यतच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या जिल्हा जलव्यवस्थापन समितीस व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत रु.५ कोटीपर्यतच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या जिल्हा जलव्यवस्थापन समितीस देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

प्रस्तावनेतील माहिती विचारात घेता ग्रामीण भागातील स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

| अ.क्र | योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार(दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजना) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | जिल्हा परिषद जिल्हा जलव्यवस्थापन समिती | शासन (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) |
| १. | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना | रु.५० लाखापर्यंत | रु.५० लाख ते रु.५ कोटी | रु.५ कोटीपेक्षा जास्त |
| २. | प्रादेशिक पाणी पुरवठा योजना | -- | रु.५ कोटी पर्यंत | रु.५ कोटीपेक्षा जास्त |

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रकरणपरत्वे ग्रामसभेची अथवा जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीची प्रथम प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना त्यासोबत योजनेचा प्राथमिक अहवाल व अंदाजपत्रक सादर करण्यात यावे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे अंदाजपत्रक प्रकरणपरत्वे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यानी तयार करावे.

४. ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्येतेचे आदेश ग्रामसेवकाने निर्गमित करावेत.

५. जिल्हा जलव्यवस्थापन समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्गमित करावेत.

६. योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

७. दरडोई खर्चाच्या विहित निकषात न बसणाऱ्या सर्व योजनांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात यावेत.

८. सदर शासन निर्णयातील तरतूदी शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

९. सदर शासन निर्गमित झाल्यानंतर ग्रामसभेच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित असलेले रु.५० लक्ष ते रु.५ कोटी किंमतीच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत.

१०. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाने त्यांच्या अनौपचरिक संदर्भ क्र.३०५/व्यय-३, दि.०६ एप्रिल,२०१३ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७१५१५४४३५२२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA

Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2013.07.22 16:29:29 +05'30'

( शैला ए. )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. विभागीय आयुक्त (सर्व)
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
१०.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मुंबई
११.महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१२.महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१४.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१५.सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१६.सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१७.सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ
१८. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१९.सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२०.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२१.सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२२.सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२३.सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२४.सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२५.सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२६.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२९.मंत्रालयातील इतर सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई
३०.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
३१.निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई
खर्चाच्या निकषात सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१३

<u>वाचा</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९५/प्र.क्र.११२४/ पापु-०७, दि.१८ मे,१९९६** 55 lpcd

२) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापाधो-११०८/प्र.क्र.५२/ पापु-०७, दि.१३ ऑगस्ट,२०१२**

३) **शासन निर्णय क्रमांकः पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१३० (III)/ पापु-०७, दि. ७ जून,२०१२**

४) **भारत सरकारच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाचे पत्र क्र.W-११०१४/०२/२०१०-NRDWP, दि.३ जानेवारी, २०१३** 55 lpcd

**<u>प्रस्तावना</u>**

संदर्भाधिन शासन निर्णय क्र.१ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत दरदिवशी दरडोई ५५ लिटर पाणी पुरवठा करण्यासाठी दरडोई खर्चाचे निकष निश्चित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात दरडोई दरदिवशी ५५ लिटर ऐवजी दरडोई दरदिवशी ४० लिटर पाणी पुरवठा हे केंद्र शासनाने स्विकारलेले धोरण, सन १९९६ ते २०१३ या कालावधीत पाणी पुरवठा योजनांच्या साहित्याच्या किंमतीमध्ये झालेली वाढ, राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींची मागणी तसेच कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांचेकडून मासिक आढावा बैठकांमध्ये करण्यात येणारी मागणी विचारात घेता दरडोई खर्चाच्या निकषात पाणी गुणवत्ता बाधित गावांसाठी ५०% व बिगर पाणी गुणवत्ता बाधित गावांसाठी ३०% अशी वाढ संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रचलित धोरणानुसार राज्यात सध्या दरडोई दरदिवशी ४० लिटर क्षमतेच्या पाणी पुरवठा योजना घेतल्या जातात. संदर्भ क्र.३ येथील शासननिर्णयान्वये मलनि:सारण योजना नसलेल्या शहरात ७० लिटर्स दरडोई दरदिवशी नुसार पिण्याचे पाणी पुरवठा करण्याचे धोरण स्विकारण्यात आले आहे. तसेच, केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये १२ व्या

पंचवार्षिक योजनेत दरडोई दरदिवशी ५५ लिटर प्रमाणे पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट असून त्याप्रमाणे राज्यांनी पाणी पुरवठा योजना तयार करण्याच्या सुचना दिल्या आहेत. दरडोई खर्चाच्या सुधारीत दराबाबत मा.मंत्री मंडळाच्या दि.११ सप्टेंबर,२०१३ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

प्रस्तावनेत नमुद केलेली माहिती विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| क्षेत्र | दि.१८ मे,१९९६ च्या शासन निर्णया प्रमाणे दरडोई खर्चाची मर्यादा | दरडोई खर्चाचे सुधारित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | ४० लिटर दरडोई दरदिवशी (दि.१८ मे,१९९६ च्या शासन निर्णयातील दरात ३०% वाढ करुन अथवा दि.१३.८.२०१२ च्या शासननिर्णयातील बिगर पाणी गुणवत्ता बाधित गावांप्रमाणे) | ५५ लिटर दरडोई दरदिवशी (सन १९९६ चे दर x १.५) | ७० लिटर दरडोई दरदिवशी (५५ LPCD च्या दरात १०% वाढ करुन) |
| **कोकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी** | | | | |
| १) निर्देशित डोंगरी भाग | २१२० | २७५६ | ३१८० | ३४९८ |
| २) ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना | १७९० | २३२७ | २६८५ | २९५३ |
| ३) ३० मीटरपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना | १३९० | १८०७ | २०८५ | २२९३ |
| **कोकण क्षेत्रासाठी** | | | | |
| १) निर्देशित डोंगरी भाग | २३३० | ३०२९ | ३४९५ | ३८४४ |
| २) ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना | १९७० | २५६१ | २९५५ | ३२५० |
| ३) ३० मीटरपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना | १५३० | १९८९ | २२९५ | २५२४ |

दरडोई खर्चाच्या उपरोक्त निकषात बसणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता द्यावी.

जास्तीत जास्त योजना विभागाच्या स्तरावर निकाली निघाव्यात यासाठी उपरोक्त विहित निकषाच्या १००% पर्यंत जास्त दरडोई खर्च असलेल्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून शासनस्तरावरुन मान्यता देण्यात येईल.

उपरोक्त विहित निकषाच्या १००% हून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांच्या प्रस्तावांना प्रधान सचिव (वित्त), प्रधान सचिव (नियोजन) व प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचा समावेश असलेल्या उच्चाधिकार समितीमार्फत मान्यता देण्यात येईल.

ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उद्भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासून ३ कि.मी.पेक्षा जास्त होत असेल किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार असेल अशा योजनांमधील ३ कि.मी.पासून पुढे किंवा १०० मीटर उंचीवरील पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक व पंपींग मशिनरी यांच्या वाढीव कामाचा खर्च दरडोई खर्च ठरवितांना विचारात घेण्यात येऊ नये.

दि.१३ ऑगस्ट,२०१२ चा शासन निर्णय या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे. तसेच ज्या ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांचे दरडोई खर्चाचे निकष दि.१३ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयान्वये शिथील केले आहेत, त्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांना सदर आदेश लागू राहतील.

सदर तरतुदी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय हा नियोजन व वित्त विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र.१८६/१४४३, दि.२३ मे,२०१३ व क्र.३७८/व्यय-३, दि.३ जून,२०१३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००९१७१४२७५७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA
Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2013.10.10 10:25:20 +05'30'

(शैला ए.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. मा.विधानसभा/विधान परिषद सदस्य
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०.सर्व महानगरपालिका आयुक्त
११.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
१३.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१४. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१५.प्रादेशिक उपसंचालक (सर्व), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
१६.मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
१७.अधीक्षक अभियंता (भारतनिर्माण कक्ष), सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१८. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२०.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदा
२१.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
२२.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
२३.मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२४.गटविकास अधिकारी (सर्व), पंचायत समिती
२५.मंत्रालयीन विभाग (सर्व) मंत्रालय, मुंबई व त्यांच्या अधिनस्त कार्यालये,
२६.पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२७.निवडनस्ती (कार्यासन पापु-०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

**जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या तथापि अपुर्ण अवस्थेत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची उर्वरित कामे पुर्ण करण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१०१३/प्र.क्र.१२२/पापु-०७

जी.टी.रुगणालय संकुल,

मंत्रालय, मुंबई-४०० ००१

तारीखः १० डिसेंबर, २०१३

**वाचा**

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७,दि.१७ मार्च,२०१०

२) **शासन शुध्दीपत्रक क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु- ०७,दि.३० ऑगस्ट ,२०१०

३) **शासन निर्णय क्रमांकः** जस्वप्र-२०१०/प्र.क्र.९०/लेशा-०४/पापु-११, दि.३० मार्च,२०११

**प्रस्तावना**

जागतीक बँक अर्थसहाय्यीत जलस्वराज्य प्रकल्प राज्यातील २६ जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर,२००३ पासून मागणी व लोकसहभागाच्या तत्वावर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने राबविण्यात येत होता.सदर प्रकल्प विहित मुदतीत सप्टेंबर,२००९ पर्यंत पुर्ण न होऊ शकल्यामुळे त्यास संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये जून,२०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.तथापि,मुदतवाढ देण्यात आल्यानंतरही जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात आलेल्या ८६ ग्रामपंचायतींमधील १०२ पाणी पुरवठा योजना अपुर्ण अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे.(जोडपत्र-१).

योजना अपुर्ण अवस्थेत असल्यामुळे त्यामधून लाभार्थ्यांना पाणी पुरवठा होऊ शकणार नाही.त्यामुळे ग्रामस्थांकडून नवीन पाणी पुरवठा योजनेची मागणी होऊ शकेल.तसेच अपुर्ण अवस्थेतील योजनांचे उर्वरित कामे पुर्ण न केल्यास त्यावर शासनाने केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे.त्यामुळे

जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात आलेल्या ,परंतू अपुर्ण अवस्थेत असलेल्या सोबत जोडलेल्या जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील ८६ ग्रामपंचायतींमधील १०२ पाणी पुरवठा योजनांची अपुर्ण कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

## शासन निर्णय

प्रस्तावनेतील माहिती विचारात घेता, जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात आलेल्या, परंतू अपुर्ण अवस्थेत असलेल्या सोबत जोडलेल्या जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील ८६ ग्रामपंचायतींमधील १०२ पाणी पुरवठा योजनांची अपुर्ण कामे (गरज व उपयुक्तता असेल तर) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुर्ण करण्यास खालील शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्ह्यातील अपुर्ण योजनांमधील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर एक समिती स्थापन करुन त्या समितीमार्फत अपुर्णावस्थेतील पाणी पुरवठा योजनांची सद्यस्थीती तपासून घ्यावी. सदर समितीमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे सदस्य म्हणून तर कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

२) योजना अपुर्ण असलेल्या गावे/वाड्या/वस्त्यांमध्ये पर्यायी योजनांमधून निकषाप्रमाणे पाणी पुरवठा होत नसेल, अशाच गावे/वाड्या/वस्त्यांमधील अपुर्ण योजनांचे काम राष्ट्रिय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुर्ण करण्यात यावे.याबाबतची खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यांनी करावी.

३) अपुर्ण कामे पुर्ण करण्याच्या प्रस्तावाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा वार्षिक कृती आराखड्यात समावेश करुन त्यास राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची (SLSC) मान्यता घेण्यात यावी.

४) अपुर्ण योजनेतील उर्वरीत कामांची अंदाजपत्रके व आराखडे तयार करताना जलस्वराज्य प्रकल्पातील मुळ योजनेत समाविष्ट असलेल्या उपांगांपैकी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या अपूर्ण उपांगांचाच योजना पूर्ण करण्यासाठी विचार करण्यात यावा. कोण्त्याही परिस्थितीमध्ये जलस्वराज्य प्रकल्पाच्या मुळ मंजूर अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असलेल्या आणि अपूर्ण असलेल्या बाबी वगळता अन्य

उपांगांसाठी NRDWP मधून खर्च अनुज्ञेय राहणार नाही. ही बाब तपासण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

५) जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत यापूर्वी झालेल्या कामांचे मुळ मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मूल्यमापन सर्वसाधारणपणे विचारात घेणे आवश्यक आहे. तथापि, मुळ मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेल्या कामांविषयी तक्रारी असल्यास, सदर तक्रारींच्या चौकशीनंतर कायम करण्यात आलेले मुल्यांकन विचारात घेणे आवश्यक राहील.

६) अपुर्ण असलेल्या आर.सी.सी.कामांच्या बांधकाम स्थैर्याची (Structural Stability) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून तपासणी करुन घ्यावी.

७) अपुर्ण कामे तयार करण्यासाठी अंदजपत्रके/आराखडे तयार करणे, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, लोकवर्गणी, निधी वितरण याबाबत वेळोवेळी निर्गमीत होणा-या शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८) रकमेचा अपहार झाल्यामुळे योजनेचे काम अपुर्ण असेल अशा योजनेची उर्वरित कामे जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत करावीत व ही कामे पुर्ण करण्यासाठी प्रथम अपहाराची रक्कम संबंधीतांकडून वसुल करण्यात यावी. वसूल करण्यात आलेल्या रक्कमेचा विनीयोग योजनेची अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी करण्यात यावा. ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

९) सदर शासन निर्णय यासोबत जोडण्यात आलेल्या जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मध्ये नमूद केलेल्या जलस्वराज्य प्रकल्पातील ८६ ग्रामपंचायत क्षेत्रातील १०२ अपुर्ण योजनांपैकी गरज आणि उपयुक्तता असलेल्या योजनांसाठीच लागू राहील.

२. सदर योजनांस राज्य शासनाकडून भविष्यात कोणताही निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही तसेच या अपूर्ण योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून (NRDWP) मधून पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७०/१४४३, दिनांक ०४/१०/२०१३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५२७/व्यय ३, दिनांक ०७/१०/२०१३ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१२१०११५२४८६१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA

Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2013.12.10 12:49:55 +05'30'

**शैला ए.**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
३. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
६. विधानमंडळ सदस्य (सर्व)
७. मुख्य सचिव यांचे उप सचिव
८. अपर मुख्य सचिव, (महसूल वन विभाग)
९. प्रधान सचिव(उर्जा),उद्योग ,उर्जा व कामगार विभाग
१०.प्रधान सचिव,ग्राम विकास व पंचायत राज
११.प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग
१२.प्रधान सचिव ,नियोजन विभाग
१३.सचिव, महसूल वन विभाग (मदत व पुनर्वसन)
१४.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मा.विभागीय आयुक्त (सर्व)
१५.जिल्हाधिकारी (सर्व)

१६.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

१७.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने

१९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

२०.सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद

२१.सर्व कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी

२२.महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)

२३.महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)

२४.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई

२५.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२६.सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

२७.सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

२८. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

२९.सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

३०.मंत्रालयातील इतर सर्व विभाग,

३१.निवडनस्ती, पापु-०७

**शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१०१३/प्र.क्र.१२२/पापु-०७, दि.१० डिसेंबर, २०१३ चे जोडपत्र-१**

**जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित जलस्वराज्य प्रकल्पामधील काही भौतिक कामे अपूर्ण अवस्थेत असलेल्या ग्रामपंचायतीबाबतचे विवरण पत्र**

| अ. क्र | जिल्ह्याचे नाव | ग्रा. प. ची संख्या | अपूर्ण पा. पु. ची योजना | मंजुर गांव कृती आराखडा किंमत | मोजमाप पुस्तके नुसार अंतिम मुल्यांकन | गावांकडून प्राप्त रक्कम | मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या माहिती नुसार योजना पुर्ण करण्यासाठी लागणारा अंदाजे खर्च. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अमरावती | ०० | ०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | अकोला | १ | १ | २५.५० | १९.९० | ५.३३ | २.९० |
| ३ | बुलढाणा | ४ | ४ | १८०.५८ | १०९.८६ | १८.१६ | ६५.७३ |
| ४ | यवतमाळ | २ | ३ | ४०.५० | २६.३० | ७.१९ | १४.८० |
| ५ | वाशिम | १ | १ | १९.५३ | १६.५१ | ०.७४ | ०.०० |
| **अमरावती विभाग** | | ८ | ९ | २६६.११ | १७२.५७ | ३१.४२ | ८३.४३ |
| ६ | औरंगाबाद | ०० | ०० | ०.०० | ००० | ०.०० | ०.०० |
| ७ | बीड | १३ | १३ | ६३८.६६ | ३६७.०४ | ७०.४२ | २७१.६० |
| ८ | हिंगोली | ४ | ४ | १२१.०४ | ८३.३६ | २२.५२ | २०.०० |
| ९ | जालना | ४ | ४ | १५५.४१ | १३४.८८ | ११.५१ | २८.५० |
| १० | नांदेड | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ११ | लातूर | १६ | २२ | ७६५.८४ | ६००.१० | ८२.२७ | ८९.९० |
| १२ | उस्मानाबाद | ११ | ११ | ३६६.६६ | २०१.८६ | १०७.१२ | ८७.२८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | परभणी | ७ | ९ | २१६.६२ | १३३.७७ | १८.०२ | ७२.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | ५५ | ६३ | २२६४.२३ | १५२१.०१ | ३११.८६ | ५६९.२८ |
| १४ | नागपूर | ३ | ४ | ११६.२९ | ९६.१० | ९.९३ | १२४.०० |
| १५ | चंद्रपूर | १ | १ | १२.८४ | ८.६४ | ०.०० | १.१० |
| १६ | वर्धा | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १७ | गडचिरोली | १ | २ | ५८.४३ | ५.८८ | ७.११ | १०२.६९ |
| १८ | गोंदिया | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १९ | भंडारा | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **नागपूर विभाग** | | ५ | ७ | १८७.५६ | ११०.६२ | १७.०४ | २२७.७९ |
| २० | ठाणे | ३ | ३ | १६४.८१ | १६४.८१ | ०.०० | ०.४० |
| २१ | रायगड | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २२ | रत्नागिरी | १ | १ | १०१.२५ | ८७.७२ | ०.०० | १७७.८६ |
| २३ | सिधुदुर्ग | १ | १ | ३११.४६ | २८६.४८ | ८०.२३ | ५२.१२ |
| **कोकण विभाग** | | ५ | ५ | ५७७.५२ | ५३९.०१ | ८०.२३ | २३०.३८ |
| २४ | पुणे | ०० | ०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २५ | सांगली | ६ | ६ | ६५८.२६ | ५३१.८६ | ६९.२६ | ११५.०० |
| २६ | सातारा | १ | १ | २४.२३ | ३.७८ | ४.१५ | ३.१२ |
| २७ | कोल्हापूर | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २८ | सोलापूर | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **पुणे विभाग** | | ७ | ७ | ६८२.४९ | ५३५.६४ | ७३.४१ | ११८.१२ |
| २९ | नाशिक | २ | ३ | ४०.५३ | २०.६७ | २१.२७ | ३६.१२ |
| ३० | धुळे | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३१ | नंदूरबार | ४ | ८ | १८७.३९ | ९४.०६ | ३५.४२ | ५१.८४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | जळगाव | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३३ | अहमदनगर | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **नाशिक विभाग** | | ६ | ११ | २२७.९२ | ११४.७३ | ५६.६९ | ८७.९६ |
| **एकूण** | | ८६ | १०२ | ४२०५.८३ | २९९३.५८ | ५७०.६५ | १३१६.९६ |

**शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१०१३ /प्र.क्र.१२२/पापु-०७,दिनांक १० डिसेंबर,२०१३ चे जोडपत्र-२**

**"जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत अपूर्ण असलेल्या योजनांची माहिती"**

| अ.क्र.. | जिल्ह्याचे नाव | ग्राम पंचायतीची संख्या | अपूर्ण असलेल्या योजनांची संख्या | तालुक्याचेनाव | ग्राम पंचायतीचे नाव | वाडी/वस्तीचे/योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अकोला | १ | १ | पातूर | खेत्री | खेत्री |
| २ | बुलढाणा | ४ | ४ | लोणार | वेणी | वेणी |
| | | | | संग्रामपूर | पळशी झाशी | पळशी झाशी |
| | | | | संग्रामपूर | खिरोडा | खिरोडा |
| | | | | जळगांव (जा) | पळशी सुपो | पळशी सुपो |
| ३ | यवतमाळ | ३ | ३ | घाटंजी | किन्ही किनारा | किन्ही किनारा |
| | | | | मारेगाव | शिवनाळा | १.शिवनाळा<br>२.पांडवविहीर |
| ४ | वाशिम | १ | १ | मालेगांव | कोटा | कोटा |
| ५ | बीड | १३ | १३ | पाटोदा | सावरगाव सोने | सावरगाव सोने |
| | | | | पाटोदा | पारगाव (घु) | पारगाव (घु) |
| | | | | शिरुर | सावरगाव (च) | सावरगाव (च ) |
| | | | | शिरुर | आर्वी | आर्वी |
| | | | | माजलगाव | खतरअडगाव | खतरअडगाव |
| | | | | गेवराई | बोरी पिंपळगाव | बोरी पिंपळगाव |
| | | | | गेवराई | मादळमोहि | मादळमोहि |
| | | | | परळी | मांडवा | मांडवा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | परळी | नागापूर | नागापूर |
| | | | | धारूर | तेलगाव | तेलगाव |
| | | | | बीड | पिंपळनेर | पिंपळनेर |
| | | | | बीड | नाळवंडी | नाळवंडी |
| | | | | परळी | गडदेवाडी | गडदेवाडी |
| ६ | हिंगोली | ४ | ४ | बसमत | कोठारी | कोठारी |
| | | | | हिंगोली | बळसोंड | बळसोंड |
| | | | | सेनगाव | गारखेडा | गारखेडा |
| | | | | कळमनुरी | रुद्रवाडी | रुद्रवाडी |
| ७ | जालना | ४ | ४ | जालना | सोलगव्हाण | सोलगव्हाण |
| | | | | जालना | तांदूळवाडी | तांदूळवाडी |
| | | | | जालना | नेर | नेर |
| | | | | परतूर | बामणी | बामणी |
| ८ | लातूर | १६ | २२ | रेणापूर | पोहरेगाव | १.पोहरेगाव<br>२.पोहरेगावतांडा |
| | | | | रेणापूर | हारवाडी | हारवाडी |
| | | | | औसा | रामेगाव | रामेगाव |
| | | | | औसा | शिवणीलाख | शिवणीलाख |
| | | | | औसा | बिरवली | १.बिरवली<br>२.रोहीदासनगर |
| | | | | औसा | एकंबी | एकंबी |
| | | | | निलंगा | हंचनळ | हंचनळ |
| | | | | निलंगा | झरी | झरी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्गीर | नागलगाव | १.नागलगाव<br>२.नागलगावतांडा |
| | | | | निलंगा | निटूर | निटूर |
| | | | | उद्गीर | शंभू उमरगा | शंभू उमरगा |
| | | | | उद्गीर | तोंडार | १.तोंडार<br>२.तोंडारवंजारवाडी,<br>गंडीवाडी,<br>तोंडारपाटी |
| | | | | अहमदपूर | तांबट सांगवी | १.तांबट सांगवी<br>२.लांजी |
| | | | | रेणापूर | दिघोळ देशमुख | १.दिघोळ देशमुख<br>२.दिघोळ देशपांडे |
| | | | | शिरुर अनंतपाळ | भिंगोली | भिंगोली |
| | | | | उद्गीर | अवळकोंडा | अवळकोंडा |
| ९ | उस्मानाबाद | ११ | ११ | उमरगाव | तुरोरी | तुरोरी |
| | | | | वाशी | सेलू | सेलू |
| | | | | परांडा | भोत्रा | भोत्रा |
| | | | | परांडा | खासगाव | खासगाव |
| | | | | परांडा | काटेवाडी | काटेवाडी |
| | | | | कळंब | हिंगणगाव | हिंगणगाव |
| | | | | तुळजापूर | अरबळी | अरबळी |
| | | | | उमरगा | केशरजवळगा | केशरजवळगा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तुळजापूर | केशेगाव | केशेगाव |
| | | | | वाशी | पिंपळवाडी | पिंपळवाडी |
| | | | | परांडा | कोकरवाडी | कोकरवाडी |
| १० | परभणी | ७ | ९ | गंगाखेड | धारासूर | धारासूर |
| | | | | गंगाखेड | डोंगरपिंपळा | डोंगरपिंपळा |
| | | | | गंगाखेड | मैराळसांगवी | मैराळसांगवी |
| | | | | परभणी | भारसवाडा | भारसवाडा |
| | | | | जितूर | गडदगव्हाण | १.गडदगव्हाण<br>२.गडदगव्हाणवाडी<br>व तांडा |
| | | | | पूर्णा | कानडखेडा | १.जुने कानडखेडा<br>२.नविन कानडखेडा |
| | | | | मानवत | रामपूरी (कु) | रामपूरी (कु) |
| ११ | नागपूर | ३ | ४ | कुही | मांढळ | मांढळ |
| | | | | सावनेर | जैतपूर | छत्रापूर |
| | | | | कुही | इसापूर नवे | १.अजनी<br>२.मोहोदरा |
| १२ | चंद्रपूर | १ | १ | जिवती | शेडवाही | जोडणघाट |
| १३ | वर्धा | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | गडचिरवली | १ | २ | चार्मोशी | वायगाव | १.वायगाव<br>२.राजगोपालपूर |
| १५ | गोंदिया | ० | ० | ० | ० | ० |
| १६ | भंडारा | ० | ० | ० | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | ठाणे | ३ | ३ | मोखाडा | मोरांडा गोंदे | मोरांडा गोंदे |
| | | | | मोखाडा | साखरी गोंदे | साखरी गोंदे |
| | | | | भिवंडी | डोहाळे | डोहाळे |
| १८ | रत्नागिरी | १ | १ | रत्नागिरी | पोमेंडी (बु) | पोमेंडी (बु) |
| १९ | सिंधुदूर्ग | १ | १ | कणकवली | फोंडाघाट | फोंडाघाट |
| २० | सांगली | ६ | ६ | कडेगाव | कडेगाव | कडेगाव |
| | | | | जत | उमदी | उमदी |
| | | | | जत | रेवनाळ | रेवनाळ |
| | | | | जत | मडग्याळ | मडग्याळ |
| | | | | जत | बसर्गी | बसर्गी |
| | | | | जत | कागनरी | कागनरी (लमाणतांडा) |
| २१ | सातारा | १ | १ | माण | अनभुलेवाडी | अनुभुलेवाडी |
| २२ | कोल्हापूर | ० | ० | ० | ० | ० |
| २३ | सोलापूर | ० | ० | ० | ० | ० |
| २४ | नाशिक | २ | ३ | पेठ | कुळवंडी | १.कुळवंडी<br>२.कडवई पाडा |
| | | | | त्र्यंबक | सारस्ते | सारस्ते |
| २५ | जळगाव | ० | ० | ० | ० | ० |
| २६ | नंदूरबार | ४ | ८ | तळोदा | अंमलपाडा | १.अंमलपाडा<br>२.रतनपाडा<br>३.रेटपाडा |
| | | | | शहादा | भोरटेक | १.भोरटेक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | २.चिखली |
| | | | | तळोदा | धनपूर | सावरपाडा |
| | | | | अक्कलकुवा | ठाणाविहीर | १.अमली<br>२.ठाणाविहीर |
| **एकूण संख्या** | | ८६ | १०२ | | ८६ | १०२ |

* * * * *

**राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकवर्गणीचे सुधारित धोरण.**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो १११३/प्र.क्र.६०/ पापु-०७

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०१ जानेवारी, २०१४

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु १०९२/प्र.क्र.३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
२) शासन निर्णय क्रमांकः ग्रापायो १२०८/प्र.क्र.९६/पापु-०७, दिनांक १८ ऑगस्ट, २००८
३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
४) शासन शुद्धीपत्रक क्रमांकः ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दि.३० ऑगस्ट, २०१०
५) शासन परिपत्रक क्रमांकः ग्रापाधो ११११/प्र.क्र. ५८ (अ)/ पापु-०७, दिनांक १६ मे, २०११
६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो १११२/प्र.क्र.९६/पापु-०७, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२

**प्रस्तावना**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मागणी आधारित लोकसहभागाचे धोरण स्वीकारलेले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंदर्भात लोकसहभागाची अट ठेवल्यास लोकांमध्ये योजनेबद्दल आपलेपणाची भावना निर्माण होईल व पर्यायाने योजनेवर त्यांची देखरेखही राहील या भूमिकेतून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या भांडवली खर्चामध्ये १० टक्के हिस्सा लोकवर्गणीचा राहील अशी तरतूद केलेली आहे. तसेच, संदर्भाधीन क्रमांक २ ते ६ येथील शासन निर्णय/ शुद्धीपत्रक/परिपत्रकांद्वारे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या लोकवर्गणीत विविध प्रकारे सवलत देण्यात आलेली आहे.

ग्रामस्थांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी वर नमूद संदर्भाधीन शासन निर्णय/ शुद्धीपत्रक/परिपत्रक क्रमांक २ ते ६ द्वारे शासनाने विविध उपाययोजना केल्या असल्या तरी, योजनांची किंमत पहाता योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के लोकवर्गणी भरणे ग्रामस्थांना/ स्थानिक स्वराज्य संस्थांना अवघड होऊ लागले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी शासकीय अनुदान लोकवर्गणीच्या प्रमाणात वितरित करावयाचे असल्याने, स्वाभाविकपणे योजनांची कामे रखडतात. महाराष्ट्र राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारली जाणारी लोकवर्गणी जमा करण्यामध्ये येणा-या अडचणी विचारात घेता त्या दूर करण्यासाठी लोकवर्गणी ही ग्रामस्थांच्या आर्थिक स्थितीनुसार आकारने योग्य होईल. मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीतील

निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकवर्गणीचे सुधारित धोरण राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येणा-या लोकवर्गणी व निधी वितरण या संदर्भात पुढीलप्रमाणे सुधारित धोरण अवलंबिण्यात येत आहे.

१) ज्या गावांमध्ये/ वाड्यांमध्ये/वस्त्यांमध्ये आतापर्यंत नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेल्या नाहीत, अशा गावांमध्ये/ वाड्यांमध्ये/ वस्त्यांमध्ये प्रतिव्यक्ती प्रतिदिन ४० किंवा ५५ लिटर क्षमतेच्या नवीन नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी लोकवर्गणीची अट लागू राहणार नाही.

२) उपरोक्त क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या परिस्थिती व्यतिरिक्त इतर सर्व प्रकरणी लोकवर्गणीची अट खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | आर्थिक दर्जा | लोकवर्गणी | | |
|---|---|---|---|---|
| | | दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा | | |
| | | ४०/५५ लिटर | ७० लिटर | १३५ लिटर |
| १ | दारिद्र्य रेषेवरील लोकांसाठी (APL) | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के अथवा प्रति कुटुंब रु.८००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के अथवा प्रति कुटुंब रु.१२००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के अथवा प्रति कुटुंब रु.१६००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम |
| २ | दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी (BPL) | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या ५ टक्के अथवा प्रति कुटुंब रु.४००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या ५ टक्के अथवा प्रति कुटुंब रु.६००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम | योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या ५ टक्के अथवा प्रति कुटुंब रु.८००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम |

(अ) कोणत्याही कुटुंबाकडून वरील मर्यादेपेक्षा जास्त रक्कम लोकवर्गणी म्हणून आकारता येणार नाही.

(ब) प्रस्तुत लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून अथवा लाभार्थ्यांकडून वसूल करून भरण्याची मुभा राहील. तथापि, लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरली तरी योजना कार्यान्वित झाल्यावर संबंधित लोकवर्गणी पाणीपट्टीसोबत वसूल करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील.

(क) लोकवर्गणीची ५० टक्के रक्कम ग्राम, आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा स्वच्छता व पर्यावरण समितीच्या बँक खात्यावर जमा केल्यानंतर शासन सहभागाच्या रकमेपैकी ३० टक्के रक्कम पहिलं हप्ता म्हणून वितरित करण्यात येईल. या निधीतून समितीने केवळ स्त्रोत विकासाची कामे हाती घेऊन ती पूर्ण करावीत. स्त्रोताच्या क्षमतेबाबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे योग्यता प्रमाणपत्र घेतल्यानंतरच इतर कामे हाती घ्यावीत.

(ड) लोकवर्गणीची उर्वरित ५० टक्के रक्कम जमा केल्यानंतर (म्हणजेच लोकवर्गणीची १०० टक्के रक्कम जमा झाल्यानंतर) शासन हिश्याच्या दुस-या हप्त्याची ३० टक्के रक्कम वितरित करण्यात येईल.

(इ) वरील रकमेचा पूर्ण विनियोग झाल्यानंतर शासन हिश्याच्या तिस-या हप्त्याची ३० टक्के रक्कम वितरित करण्यात येईल. उर्वरित १० टक्के निधी योजना पुढील एक वर्ष सुरळीत चालविल्यानंतर वितरित करण्यात येईल.

सदर शासन निर्णयाच्या तरतुदी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयापासून (दिनांक १२ डिसेंबर, २०१३ पासून) लागू होतील. दिनांक १२ डिसेंबर, २०१३ पूर्वी प्रशासकीय मान्यता मिळून, कार्यारंभ आदेश (Work Order) देण्यात आलेल्या योजनांसाठी या शासन निर्णयाच्या तरतुदी लागू राहणार नाहीत.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या लोकवर्गणी संदर्भात निर्गमित करण्यात आलेले यापूर्वीचे संदर्भाधीन क्रमांक २, ४, ५ व ६ येथील शासन निर्णय/ परिपत्रक/ शुद्धीपत्रक या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सदरचा शासन निर्णय हा नियोजन व वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे २४३/१४४३, दिनांक १०/०९/२०१३ व ४९८/व्यय ३, दिनांक २०/०९/२०१३ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201401011718301228 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA

Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2014.01.01 17:54:03 +05'30'

**(शैला ए.)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. उपमुख्यमंत्री यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०.सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (मंत्रालयीन विभाग) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
११.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१२.विभागीय आयुक्त (सर्व)
१३.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
१५.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१६.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापुर, नवी मुंबई.
१७.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१८.महालेखापल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१९. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२०. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२१. कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२२. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदा सर्व.
२३. मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२५. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक, पापु-०७.

जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात
राबवावयाच्या जलस्वराज्य-२ कार्यक्रम
अंमलबजावणी बाबत.

# महाराष्ट्र शासन
## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१२१३/प्र.क्र.२००/पापु-११

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
नविन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: ०४.०१.२०१४

**वाचा**

१) शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.डब्ल्यूबीपी-१०९४/सीआर८३१/४१-अ, दिनांक १५/०६/१९९४
२) शा. नि. क्र. जस्वप्र २००४/प्र.क्र. ३८३५/पापु-११, दि.०७/०६/२००४

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार ११ व्या अनुसूचीमध्ये पिण्याच्या पाण्याचा विषय पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रामध्ये आणण्यात आल्याने शासनाने या बाबतीतील अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याचा पुरोगामी निर्णय जुलै, २००० मध्ये घेतला असून त्याअन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल व दुरुस्ती ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने ग्रामीण भागामध्ये मागणी आधारित व लोकसहभागातून पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता कार्यक्रम हाती घेण्यासाठी शासनाने सप्टेंबर, २००३ मध्ये जागतिक बँके बरोबर 'जलस्वराज्य प्रकल्प' राबविण्यासाठी करार केला होता. सदर प्रकल्प राज्यामध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला आहे. वर्धितवेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम आणि स्वजलधारा कार्यक्रमानंतर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एप्रिल, २००९ पासून राज्यातील ३३ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागासाठी पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार स्वच्छतेच्या व्याप्तीचा वेग वाढविण्यासाठी संपूर्ण ग्रामपंचायतीला केंद्रबिंदू मानून राज्यामध्ये निर्मल भारत अभियान राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांची अंमलबजावणी प्रक्रिया अधिक परिणामकारक करणे आणि मागणी आधारित प्रचलित धोरण बळकट करणे आवश्यक आहे.

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना, जलधर पाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प यांची यशस्वीता पाहता जलधर पाणी व्यवस्थापन प्रकल्पाची व्याप्ती वाढविणे, पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाडया/वस्त्यांसाठी किमान खर्चामध्ये आणि पर्यावरणाला हानीकारक ठरणार नाही अशा पध्दतीने रासायनिक दूषितीकरण सौम्य करण्यासाठीची उपाययोजना करुन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे तसेच दुर्गम / पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पर्जन्य जल साठवण टाक्या बांधून कायमस्वरुपी टंचाई निवारण करण्याची उपाययोजना करणे, राज्यातील नागरीकरणाचा दर देशात सर्वात जास्त असल्याने नव्याने विकसित होत असलेल्या निमशहरी भागांमध्ये राहणाऱ्या जनतेला वाढीव दर्जाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधा पुरविणे आणि स्थानिक पातळीवर पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे झाल्यामूळे या बाबींना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. २) वरील बाबी विचारात घेऊन एकूणच संस्थात्मक सुधारणा करणे, सुविधांची व्याप्ती (Coverage) वाढविणे, सुविधांच्या दर्जामध्ये वाढ करणे, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व्यवस्था बळकट करणे, स्थानिक पातळीवर पाणी व्यवस्थापन करणे इ. उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी स्वतंत्र कार्यक्रमाची आवश्यकता आहे. उच्च दर्जाच्या सेवा पुरविण्यासाठीचे प्रयोगनिर्देशन (Demonstration) करणाऱ्या योजना आणि कायमस्वरुपी टंचाईचे निवारण करणाऱ्या उपाययोजना करण्यासाठी राज्यामध्ये जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबविण्याच्या प्रस्तावास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत गठित बाहय अर्थसहाय्यीत प्रकल्पांसाठीच्या शक्ती प्रदान समितीने दि. २ मार्च, २०१३ रोजी झालेल्या ५५ व्या बैठकीमध्ये तत्वत: मान्यता प्रदानित करुन जलस्वराज्य-२ कार्यक्रमास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यासाठी निर्देशित केले. सदर कार्यक्रमास जागतिक बँकेकडून आर्थिक सहाय्य तसेच जागतिक स्तरावरील अनुभव प्राप्त होणार असल्याने त्यांचेकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्यासाठी विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाने दि. २० नोव्हेंबर, २०१३ रोजी मान्यता प्रदान केली आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रम राज्यामध्ये कार्यान्वित करण्यासंदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत.

## शासन निर्णय

उपरोक्त प्रस्तावनेच्या अनुषंगाने राज्यामध्ये लोकसहभागातून आणि मागणी आधारित तत्वावर जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून या कार्यक्रमाचा कालावधी कार्यक्रम सुरु झाल्यापासून ६ वर्षाचा राहणार आहे. या कार्यक्रमाची किंमत २३५ दशलक्ष डॉलर असून त्यापैकी ७०% कर्ज (१६५ दशलक्ष डॉलर( व ३०% (७० दशलक्ष डॉलर( राज्य शासन व लोक सहभाग राहणार आहे. जागतिक बँकेकडून १.२५% या व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध होणार असून त्यावर ०.७५% या दराने सेवा आकार लागु राहील.

**२. कार्यक्रमाची उद्दीष्टे**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची उद्दीष्टे खालील प्रमाणे राहतील.

१) राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता या बाबतीत या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचावणे.

२) निम शहरी भागांमध्ये आणि पाणी गुणवत्ता बाधित व पाणी टंचाईच्या भागांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत पाणीपुरवठा सेवा पुरविणे.

**३. कार्यक्रमाचे घटक**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमामधील गुंतवणूक खालील तीन मुख्य घटकांतर्गत राहील. **(परिशिष्ट १)**

**अ) मुख्य भौतिक गुंतवणूक**

या अंतर्गत निम शहरी भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधा पुरविणे, पाणी गुणवत्ता बाधित गावे वाड्यावस्त्यांसाठी/ कमी खर्चाच्या रासायनिक दुषीतीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, दुर्गम किंवा पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पर्जन्यजल साठवण उपाययोजना आणि अतिशोषीत पाणलोट क्षेत्रामध्ये जलधर स्तरावर पाणी व्यवस्थापन विकसित करणे या बाबी समाविष्ट असतील.

**ब) इतर भौतिक गुंतवणूक**

या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागातील तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रयोगशाळाचे बळकटीकरण, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्थेस (मित्रा, नाशिक( पाणी व स्वच्छता क्षेत्रातील उत्कृष्टता केंद्र म्हणून विकसित करणे, जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील उप विभागीय कार्यालयांमध्ये सोयी सुविधा विकसित करणे या बाबी समाविष्ट असतील.

**क) मृदू घटकांसाठीची गुंतवणूक**

यामध्ये पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रातील संस्थांचे बळकटीकरण, क्षमता बांधणी, कार्यक्रम व्यवस्थापन तसेच क्षेत्र सुधारणेसाठी निर्माण केलेल्या पदांचे वेतन, भत्ते व अनुषंगीक खर्च, क्षेत्र स्तरीय संनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली विकसित करणे इत्यादि घटक समाविष्ट असतील.

**४. कार्यक्रमाचे कार्यक्षेत्र**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमातील मुख्य भौतिक गुंतवणुक व अनुषंगिक बाबींची अंमलबजावणी राज्यातील सहा महसूली विभागातील प्रत्येकी २ अशा खालील १२ जिल्हयांमध्ये करण्यात येईल.

| अ.क्र. | महसूल विभाग | जिल्हे |
|---|---|---|
| १ | अमरावती | अमरावती व बुलढाणा |
| २ | औरंगाबाद | नांदेड व औरंगाबाद |
| ३ | कोकण | रायगड व रत्नागिरी |
| ४ | नागपूर | नागपूर व चंद्रपूर |
| ५ | नाशिक | जळगाव व अहमदनगर |
| ६ | पुणे | पुणे व सातारा |

याव्यतिरीक्त इतर गुंतवणूक राज्यातील ३३ ग्रामीण जिल्हयांमध्ये करण्यात येईल.

**५. कार्यक्रमाची अंमलबजावणी**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमातील विविध घटकांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषदा, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य सेवा संचालनालय( आणि पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो( यांचे मार्फत होईल. यासाठी या संस्थांमधील उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करण्यात येईल. कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन प्रभावीपणे होण्याकरीता कार्यक्रम अंमलबजावणीसाठी १६९ पदे व क्षेत्रीय संस्थांच्या बळकटीकरणासाठी ५१७ पदे अशी एकूण ६८६ पदे जलस्वराज्य-२ कार्यक्रम कालावधीपुरती तात्पुरती निर्माण करण्यात येत आहेत. जलस्वराज्य-२ या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार प्रतिनियुक्तीकंत्राटी/ पध्दतीने पदे भरणे, प्रतिनियुक्तीवर अधिकारीकर्मचारी/ उपलब्ध न झाल्यास कंत्राटी पध्दतीने तसेच कंत्राटी पध्दतीने भरावयाचे मनुष्यबळ उपलब्ध न झाल्यास प्रतिनियुक्तीने भरणे, पदांचा कालावधी, पद भरतीची प्रक्रिया, मानधनवेतन/ व इतर आस्थापना विषयक बाबी संबंधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना राहतील. कार्यक्रम संपल्यानंतर ही सर्व पदे व्यपगत होतील. पदांचा तपशिल **परिशिष्ट - २** मध्ये जोडला आहे.

**६. प्रोग्राम फॉर रिझल्टस् (PforR) वित्तीय साधन**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य प्रोग्राम फॉर रिझल्टस् या वित्तीय साधनांतर्गत उपलब्ध होणार आहे. या साधनांतर्गत मिळणारे अर्थसहाय्य उद्दिष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी (Disbursement Linked Indicators - DLIs) निगडीत आहे. स्वतंत्र तपासणी यंत्रणेमार्फत उद्दिष्टपूर्तीची खात्री झाल्यानंतर अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे. या बाबतचा तपशील **परिशिष्ट-३** मध्ये जोडला आहे. निधी संवितरण निर्देशकांमध्ये भविष्यात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास राहतील.

**७. कार्यक्रमासाठीचा नियतव्यय**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी सन २०१३-२०१४ करीता तसेच कार्यक्रम कालावधीमध्ये लागणारा नियतव्यय नियोजन विभाग व वित्त विभागाकडून दरवर्षी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास उपलब्ध करुन देण्यात येईल.

**८. वाटाघाटी व करारनामा**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमासंदर्भात केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयातील अर्थकार्य विभाग आणि जागतिक बँकेसोबत वाटाघाटी आणि जागतिक बँकेसमवेत करावयाचा करारनामा करण्यासाठी प्रधान सचिव (पापु. व स्व(.वि., प्रधान सचिव (वित्त विभाग(, उप सचिव तथा प्रकल्प संचालक (सुस. व प्र(कक्ष.व्य. आणि प्रकल्प व्यवस्थापक (सुस. व प्र(कक्ष.व्य. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**९. कार्यक्रम अंमलबजावणीचे अधिकार**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची अंमलबजावणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार करण्यात येईल.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील बाहय सहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्पांसाठी संदर्भीय क्र. १ व २ वरील शासन निर्णयानुसार गठीत केलेल्या शक्ती प्रदान समितीला या कार्यक्रमासाठी, शासन कार्य नियमावली (Rules of Business) प्रमाणे ज्या विषयाबाबतचे निर्णय मंत्रीमंडळानेच घ्यायचे आहेत ते सोडून, शासनाचे इतर सर्व अधिकार देण्यात आले आहेत.

जलस्वराज्य-२ कार्यक्रम अंमलबजावणीचे सर्व अधिकार व जबाबदारी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांची राहील.

सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६/१४१४, दि. १० मे, २०१३ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४८२/ व्यय-३, दि. ३० ऑगस्ट, २०१३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१०३१३२११४२२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA

Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2014.01.04 16:55:07 +05'30'

(शैला ए.)
उप सचिव तथा प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-२६,
२) मामुख्यमंत्री. यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
३) माउपमुख्यमंत्री. यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४) मामंत्री. (पाणी पुरवठा व स्वच्छता( यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
५) मामंत्री. (सर्व( यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
६) माराज्यमंत्री. (पाणी पुरवठा व स्वच्छता( यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
७) माराज्यमंत्री. (सर्व( यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
८) मा. विधानसभाविधान/ परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई-३२,
९) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय तथा सदस्य, शक्ती प्रदान समिती,
१०) अपर मुख्य सचिव (वित्त(, वित्त विभाग, मंत्रालय तथा अध्यक्ष शक्ती प्रदान समिती,
११) प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय तथा सदस्य, शक्ती प्रदान समिती,
१२) प्रधान सचिव, (व्यय(, वित्त विभाग, मंत्रालय तथा विशेष निमंत्रित, शक्ती प्रदान समिती,
१३) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती,
१४) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती,